Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
539, Rajendranagar,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
५३९, राजेंद्रनगर,
कोल्हापूर - ४१६००४

Ph. No. (0231) 2696101/ 2 / 3 Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/लेखा/दुष्काळ-2023/परीक्षा फी फेब्रु/मार्च 2024/683 दिनांक : 20 / 02 / 2025

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली व कोल्हापूर जिल्हे.

**विषय : सन 2023-2024 मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील इ.10 वी व 12 वीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेकरिता उर्वरित विद्यार्थ्यांचे बँक खाते व अनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी अंतिम संधी म्हणून दिनांक 18 फेब्रुवारी ते 28 फेब्रुवारी, 2025 या कालावधीत ऑनलाईन पोर्टल उपलब्ध असल्याबाबत.**

**संदर्भ :** 1) शासन निर्णय क्र.एससीवाय-2023/प्र.क्र.37/म-7, दि. 31.10.2023 व 10.11.2023.
2) शासन निर्णय क्र. संकीर्ण 2019 / प्र.क्र.47 / एसडी-5, दिनांक 01.08.2019 व शुध्दीपत्रक दिनांक 03.02.2020.
3) क्र.रा.मं./सन 2023 दुष्काळ ख.हं./439, दि. 31.01.2025.
4) क्र.रा.मं./सन 2023 दुष्काळ ख.हं./705, दि. 18.02.2025.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्र क्र.3 अन्वये सन 2023-24 मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांना इ.10 वी व इ.12 वीच्या परीक्षा शुल्क परतावा तांत्रिक अडचणीमुळे मिळू शकला नाही. तांत्रिक अडचणीमुळे पात्र विद्यार्थी फी परताव्याच्या लाभापासून वंचित राहू नये म्हणून विद्यार्थ्यांचे बँक खाते व अनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी **ऑनलाईन पोर्टल दिनांक** 03 **फेब्रुवारी ते दिनांक** 14 **फेब्रुवारी** 2025 या कालावधीत उपलब्ध करून देण्यात आलेले होते.

अद्यापि इ.10 वी व इ.12 वी चे बऱ्याच विद्यार्थ्यांना परीक्षा फी परतावा देणे बाकी आहे. **शासनाकडून उपलब्ध झालेल्या निधीचा विनीयोग आर्थिक वर्ष 2024-2025 संपण्यापूर्वी दिनांक 31 मार्च 2025 अखेर होणे आवश्यक असल्याने तसेच एकही पात्र विद्यार्थी फी परतावा योजनेपासून वंचित राहू नये यासाठी पुन:श्च एकदा अंतिमत: संधी** देण्यात येत आहे.

तरी या पूर्वी परीक्षा शुल्काचा परतावा न झालेल्या पात्र विद्यार्थ्यांचे पात्र विद्यार्थ्यांचे आधार लिंक असलेले बँक खाते तपशील, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड इ. माहिती **दिनांक** 18.02.2025 **ते** 28.02.2025 **या कालावधीत ऑनलाईन पोर्टलवर** भरण्याची कार्यवाही गांभियाने व अचुकपणे करण्यात यावी. तसेच कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षा शुल्काचा परतावा मिळणेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत :

1. मा. शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, हत्ती महल, सोमवारपेठ, कोल्हापूर
2. शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सातारा / सांगली / कोल्हापूर

D/Ansar/Dushkal 23-24/Letter